नागरी जमिन( कमाल धारणा व विनियमन) अधिनियम,१९७६ अतिरिक्त जमिनीवरील " सार्वजनिक गृहबांधणी", "उच्चघनता गृहनिर्माण" आणि " विस्थापितांसाठी गृहनिर्माण" या आरक्षणाने बाधित असणा-या जमिनींचा बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास करताना शासनाला प्रत्यार्पित करावयाच्या ५ टक्के बांधकामयुक्त क्षेत्राची अट शिथिल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय, क्र. नाजक१०(२०००)/प्र.क्र.२०/नाजकुधा-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ नोव्हेंबर,२००७.

वाचा :- महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्र. नाजक१०(२०००)/प्र.क्र.२०/ नाजकुधा-१, दिनांक ९.४.२००१.

प्रस्तावना :-

नागरी जमिन( कमाल धारणा व विनियमन) अधिनियम,१९७६ अंतर्गत अतिरिक्त जमिनीवरील " सार्वजनिक गृहनिर्माण", "उच्चघनता गृहनिर्माण" आणि "विस्थापितांसाठी गृहनिर्माण" या आरक्षणाने बाधित असणा-या जमिनीवर बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास करण्यास कलम २० अन्वये परवानगी दिली असल्यास अशा योजनेतून, महानगरपालिका/ मुंबई मंडळास देय ठरणा-या सदनिका विनामूल्य हस्तांतरीत करण्याच्या अटीवर, शासनाला प्रत्यार्पित करावयाच्या ५ टक्के बांधकामयुक्त क्षेत्राची अट शिथिल करण्याचा निर्णय उपरोक्त दिनांक ९.४.२००१ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे.

तथापि, सदर क्षेत्र अतिरिक्त असल्याने या अतिरिक्त क्षेत्रावरील आरक्षण विकसित करताना ५ टक्के बांधिव क्षेत्र शासनास मिळणे आवश्यक आहे. कारण सदरचे क्षेत्र अतिरिक्त असल्याने शासनाचे आहे. ही बाब विचारात घेता उपरोक्त दिनांक ९.४.२००१ चा शासन निर्णय रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या संदर्भात शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

: शासन निर्णय :

अतिरिक्त जमिनीवरील " सार्वजनिक गृहबांधणी", "उच्चघनता गृहनिर्माण" आणि "विस्थापितांसाठी गृहनिर्माण" या आरक्षणाने बाधित असणा-या जमिनीचा विकास

Kepel G.K.

Scanned with CamScanner

करताना शासनाला प्रत्यार्पित करावयाच्या ५ टक्के बांधकाम युक्त क्षेत्राबाबतची अट शिथिल करण्याबाबत जारी करण्यात आलेला दि. ९.४.२००२ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( वि. कृ. कुलकर्णी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
७) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर.
८) जिल्हाधिकारी, ठाणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, नागपूर, पुणे, मुंबई, मुंबई उपनगर.
९) महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई/पुणे/ठाणे/उल्हासनगर/नागपूर/मिरा-भाईंदर/कल्याण-डोंबिवली/भिवंडी/नाशिक/कोल्हापूर/सोलापूर/सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका.
१०) अतिरिक्त जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/ठाणे.
११) उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर/सोलापूर/कोल्हापूर/सांगली.
१२) मुख्य अधिकारी, नगरपरिषद अंबरनाथ/बदलापूर/वसई-विरार/कामठी/तळेगाव-दाभाडे.
१३) या विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, निवडनस्ती/ नाजकधा-१, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.